## वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा

पहिला मजला, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११००१

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६१३००५४ ई-मेल : vslnapune22@gmail.com


क्रमांक:वपावियं/कृषी/प्र.मं.कृ.सिं.यो.२.०.तां.स.१२ वी बैठक/ ५१६/२०२५ दि. २१/ ०५/२०२५.

प्रति,

१. मा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे

२. मा. आयुक्त, मनरेगा, नागपूर

३. मा. अपर आयुक्त, जलसंधारण तथा मुख्य अभियंता (मृद व जलसंधारण पुणे)

४. मा. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

५. मा. संचालक, सुदूर संवेदन उपाय योजना केंद्र, पुणे

६. मा. मुख्य वन संरक्षण, वने, पुणे

७. मा. सह सचिव, मृद व जलसंधारण मंत्रालय, मुंबई

८. मा. अवर सचिव, मृद व जलसंधारण मंत्रालय, मुंबई

९. मा. अध्यक्ष, जानपीर ग्रामविकास संस्था, शिरपूर, ता आष्टी, जि. बीड

१०. मा. संचालक, मृद संधारण व पा.क्षे.व्य. महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय - प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक- २.०(PMKSY-WDC-२०) अंतर्गत अमरावती, गडचिरोली व सांगली या जिल्ह्यांकडून NRM & Governance अंतर्गत प्राप्त अमृत सरोवर प्रस्तावांची छाननी करणेबाबत राज्यस्तरीय तांत्रिक समिती ची १२ वी बैठक आयोजित करणेबाबत.

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. कंपुयो २०२२/प्र.क्र.१५/जल-८ दि. २७-०४-२०२२.

२. महाराष्ट्र शासन शुद्धीपत्रक क्र. केपुयो २०२२/प्र.क्र.१५/जल ८ दि. ११.०५-२०२३.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक- २.० (PMKSY-WDC-२.०) अंतर्गत अमरावती, गडचिरोली व सांगली या जिल्ह्यांकडून NRM & Governance अंतर्गत प्राप्त अमृत सरोवर प्रस्तावांची छाननी करणेबाबत राज्यस्तरीय तांत्रिक समिती ची १२ वी बैठक दिनांक २२ मे, २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता Online आयोजीत करण्यात आली आहे. त्याची लिंक पुढीलप्रमाणे-

https://teams.microsoft.com/l/meetup-
join/19%3ameeting_M2ZlNWQwMGQtMTdkNS00MGE2LThlYjYtZGMwNDdlZWRhZjNi%40thread.v2/
0?context=%7b%22Tid%22%3a%223631cddb-a875-41cf-9737-
b5cf09a03bbe%22%2c%22Oid%22%3a%22cf96aad2-8c2c-458a-b64f-97d2d218bf19%22%7d

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० (PMKSY-WDC-२.०) अंतर्गत अमरावती, गडचिरोली व सांगली जिल्ह्यांकडून NRM & Governance अंतर्गत अमृत सरोवर प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) मान्यतेसाठी या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. सदर सविस्तर प्रस्तावाला Online पद्धतीने राज्यस्तरीय तांत्रिक समितीची (SLTC) बैठक घेऊन छाननी करणे व पात्र ठरलेल्या प्रस्तावात दुरुस्ती सुचविणे, सुचना करणे, पात्र ठरलेले प्रस्ताव

राज्यस्तरीय नोडल एजन्सीकडे मंजुरीसाठी प्रस्तावित करणेसाठी बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. तरी आपण सदर online बैठकीस उपस्थित रहावे ही विनंती.

बैठकीसाठी विषय सूची खालीलप्रमाणे-

१. अमरावती, गडचिरोली व सांगली या जिल्ह्यांकडून NRM & Governance अंतर्गत प्राप्त अमृत सरोवर प्रस्तावांची छाननी करणेबाबत.

मा.मु.का.अ. यांच्या मान्य टिपणीन्वये

21.5.25.

(कमलाकर रणदिवे)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अध्यक्ष, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा तथा सचिव (मृद व जलसंधारण महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई ३२

प्रत - माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव

१. अमरावती, गडचिरोली व सांगली या जिल्ह्यांकडून NRM & Governance अंतर्गत प्राप्त अमृत सरोवर प्रस्तावांची छाननी करणेबाबत राज्यस्तरीय तांत्रिक समिती ची १२ वी बैठक आयोजित करणेबाबत सविस्तर प्रकल्प अहवालासह व बैठकीत करावयाच्या सादरीकरणासह उपस्थित रहावे.

# दि. २२/०५/२०२५ रोजी आयोजित राज्यस्तरीय तांत्रिक समितीची १२ वी बैठकीचे इतिवृत्त

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीची १२ वी बैठक (ONLINE) पद्धतीने दि. २२/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता आयुक्त, मृद व जलसंधारण, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश खपले | अध्यक्ष तथा आयुक्त, मृद व जलसंधारण, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.० |
| २ | श्री. मनोहर मुंढे | आयुक्त (कृषी) यांचे प्रतिनिधी - सह संचालक, मृद संधारण, कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३ | श्री.अरविंद उपरीकर | आयुक्त मनरेगा नागपूर यांचे प्रतिनिधी - उपायुक्त, मनरेगा, नागपूर |
| ४ | डॉ. संजय पाटील | प्रमुख, MRSAC, पुणे |
| ५ | श्री. सुभाष घाडगे | संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे प्रतिनिधी - वरिष्ठ भूवैज्ञानिक |
| ६ | श्री. कमलाकर रणदिवे | अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.० |

सदर बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची यादी स्वतंत्रपणे जोडण्यात येत आहे. बैठकीच्या सुरुवातीला श्री. दिलीप प्रक्षाळे, पाणलोट विकास नियंत्रक (कोकण,पुणे,नाशिक व छ संभाजीनगर विभाग ), वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करून बैठकीच्या अनुसंगाने प्रास्ताविक केले.

अमृत सरोवर या बाबी अंतर्गत प्रत्येक पाणलोट क्षेत्रात किमान एक अमृत सरोवर ही योजना राबविण्याबाबतच्या सूचना मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली सर्व जिल्हाधिकारी समवेत यांच्या दि. २४/०४/२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या आहेत.

अमृत सरोवर या घटकाकरिता Natural Resourse Management and Governance मधून निधी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच वसुंधरा, पुणे या कार्यालयाचे पत्र क्र.

जा.क्र./PMKSY-WDC-२.०/अमृत सरोवर मा.सु./४७३/२०२५ दि. ०७/०५/२०२५ नुसार योजने अंतर्गत अमृत सरोवर बांधकामाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

अमृत सरोवर(खोदतळे) या कामाच्या अंमलबजावाणीपुर्वी SITE SELECTION, स्थान निश्चिती प्रमाणपत्र, LEAD PROPOSAL, ESTIMATE मध्ये घ्यावयाच्या बाबी, तांत्रिक मान्यता व त्यानंतर ADMINISTRATIVE APPROVAL (प्रशासकीय मान्यता) या बाबी सर्व विभागाच्या UNIFORM होण्याच्या दृष्टीने त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणे गरजेचे आहे. त्यानुसार खालील प्रमाणे बाबनिहाय मुद्दे विषद करण्यात आले.

- प्रशासकीय मान्यतेसाठी अंदाजपत्रक वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेकडे सादर करताना विचारात घ्यावयाचे मुद्दे -

१. जमीन प्रकार : अमृत सरोवर(खोदतळे) हे काम फक्त शासकिय जमिनीवरच घेण्यात यावे.ज्या शासकीय संस्थेची जमीन असेल त्यांचे नाहरकत / ठराव घेण्यात यावा.

२. स्थान निश्चिती : नैसर्गिक ओघळीच्या ठिकाणी अपधावाद्वारे पावसाच्या पाण्याची उपलब्धता होईल अश्या ठिकाणी (साधारणपणे ३%-५% उताराच्या ठिकाणी) अमृत सरोवर जागेची निश्चिती करण्यात यावी. याबाबत जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी कार्यस्थळी भेट देऊन स्थळ व संरेखा निश्चित करून प्रमाणित करणे आवश्यक आहे.

३. सिंचन क्षेत्र : प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सिंचन लाभ निश्चित करावेत.

४. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यापूर्वी आवश्यक कार्यवाही :

I. अमृत सरोवर(खोदतळे) -जमीन धारकाची नाहरकत परवानगी दाखला/ ठराव/ पत्र.

II. अमृत सरोवर(खोदतळे)- स्थान निश्चिती प्रमाणपत्र .

III. जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वी प्रथम भूस्तर वर्गीकरण करावेत व त्यानुसारच अंदाजपत्रकातील EXCAVATION ITEMS च्या तरतुदी असाव्यात.

IV. तांत्रिक मान्यतेपुर्वी वहन अंतर तक्ता प्रस्तावास सक्षम स्तरावरून मान्यता घेण्यात यावी.

V. अंदाजपत्रकास DWCO कार्यालयाकडून तांत्रिक मान्यता घ्यावी.

VI. निधी तरतूद : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० : नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि नियमन अंतर्गत उपलब्ध निधी.

VII. अंदाजपत्रकासाठी मृद व जलसंधारण विभाग दरसूची २०२२-२३ वापरण्यात यावी.

VIII. अंदाजपत्रकात दर प्रथक:रण RATE ANALYSIS मध्ये खालील प्रमाणे तरतुदी असाव्यात

IX. दर प्रथकरणात सर्वसाधारण टिप्पणीत नमूद करण्यात आलेनुसार BASIC RATE + (TRIBAL AREA CHARGES, SUGARCANE AREA CHARGES, HILLY AREA CHARGES यापैकी जे लागू असेल ते)+ LABOUR WELFARE CHARGES १% या प्रमाणे घेण्यात यावेत.

५. अमृतसरोवर कामाची एकूण प्रशासकिय मान्यतेसाठीची किमत = GENERAL ABSTRACT( RECAPITULATION) total Cost = (अ) +(ब)

अ = ((ABSTRACT Value of all items )+ GST ON ABSTRACT Value of all items + १ % INSURANCE on ABSTRACT Value of all items))

ब = ३% Contegencies on (अ).

६. ADMINISTRATIVE APPROVAL साठी लागू होणारे मापदंड:-

a. B. C.RATIO :- SHOULD BE MORE THAN १

b. ERR :-SHOULD BE MORE THAN १०%

c. PER TCM COST =((जलसंपदा विभाग शासन निर्णय दिनांक १३.०७.२०१८ नुसारचे लघु पाटबंधारे योजनासाठीचे त्या त्या विभागासाठी लागू असलेले आर्थिक मापदंड + २५% मापदंडात वाढ ( जलसंधारण विभाग शासन पत्र दिनांक ११.०२.२०२२ नुसार )

७. अमृत सरोवर ही योजना RECHARGE STRUCTURE असल्याने या योजनेसाठी फक्त PER TCM COST हा एकच मापदंड विचारात घेण्यात यावा.

८. ज्या योजना आर्थिक विश्लेषण मापदंडात सफल असतील त्याच योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येतील.

९. GEOTAGGING -काम सुरु करण्यापूर्वी , ५०% काम पूर्ण झाल्यानंतर व १००% काम पूर्ण झाल्यावर GEOTAGGING ३ मिनिटाचे VIDEO चित्रीकरणासह करण्यात यावेत.

१०. गुणनियंत्रनाच्या दृष्टीने कामाची तपासणी गुणनियंत्रण पथकाकडून करण्यात यावीत.

११. त्यानुसार " अमृत सरोवर कामाच्या अंदाजपत्रकास जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करून सदर अंदाजपत्रक जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा पाणलोट समिती कक्ष यांच्या मान्यतेने/ सहमतीने अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,पुणे यांना सादर करावीत.

वरीलप्रमाणे सर्व मुद्द्यांवर सांगोपांग चर्चा करण्यात येऊन योग्य ते निर्देश संबधितांना देऊन श्री. दिलीप प्रक्षाळे, पाणलोट विकास नियंत्रक (कोकण,पुणे,नाशिक व छ. संभाजीनगर विभाग) यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षाच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

22.5.25

(कमलाकर रणदिवे)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

(प्रकाश खपले) भा.प्र.से.
आयुक्त, मृद व जलसंधारण,
महाराष्ट्र राज्य तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ०१

उपस्थित अधिकाऱ्यांची नावे खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| ६ | श्रीम. अश्विनी जगताप | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.० |
| ८ | श्री. दिलीप प्रक्षाळे | पाणलोट विकास नियंत्रक (कोकण,पुणे,नाशिक व छ संभाजीनगर विभाग) |
| ९ | श्री. पांडुरंग शेळके | पाणलोट विकास नियंत्रक (अमरावती व नागपूर विभाग) |
| १० | श्री.सुनील जाधव | जिल्हा जलसंधारण अधिकारी, अमरावती. |
| ११ | श्री.अमित राऊत | जिल्हा जलसंधारण अधिकारी, गडचिरोली. |
| १२ | श्री. अजगेकर | जिल्हा जलसंधारण अधिकारी, सांगली. |